गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,

# अधीक्षक अभियंता व प्रशासक

## लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,लातूर- 413512.

**कव्हा पाटबंधारे वसाहत,कव्हा रोड,लातूर.**

**दुरध्वनी क्र.** 02382-295508, E-Mail : secadalatur@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. लाक्षेविप्रा.लातूर/आस्था-1/धा-13/3223** **दिनांक :-** 25/11/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन,
कोथरुड पुणे- 411038.

**विषय :-** जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेस्तव जाहिरात जलसंपदा विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे बाबत.

**संदर्भ :-**
१. म.शा.,सामान्य प्रशासन विभाग,शानिक्र-संकिर्ण२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६
२. म.शा.,सामान्य प्रशासन विभाग,शानिक्र./मावज-२०१८/प्र.क्र.३४८/१८ दि. २०.१२.२०१८
३. प्राधिकरण कार्यालयाचे पत्र जा.क्र.लाक्षेविप्रा/आस्था-१/धा-१३/२५१९ दिनांक १९/०९/२०२२
४. महामंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.गोमपाविम/आस्था-२/९५३४ दिनांक ०३/११/२०२२

उपरोक्त विषयी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नेमणुक करण्याबाबत जाहिरात या सोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदर जाहिरात http://wrd.maharashtra.gov.in या वेब साईटवर दिनांक 05/12/2022 रोजी किंवा त्यापुर्वी प्रसिध्द करावी.

सोबत:- जाहिरात.

**स्थळ प्रत मा. अ.अ. व प्र. यांचे स्वाक्षरीत.**

(श्रीमती. म. व्यं. तोरणाळे)
उपअधीक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर.

**प्रत :-** कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**सोबत :-** जाहिरातीचा प्रारुप मसुदा

**प्रत:-** मा. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक,लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**सोबत :-** जाहिरातीचा प्रारुप मसुदा

# -:: परिशिष्ट -1 ::-

**विषय :-** जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर जाहिराती, नोटीसा, दरपत्रके इत्यादी प्रसिध्द करणे बाबत.

| अ. क्र. | विषय | तपशील (मराठी मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | विषय | जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेस्तव जाहिरात जलसंपदा विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे बाबत. |
| 2 | कार्यालयाचे नांव | अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर |
| 3 | अपलोड करण्याविषयी मागणी करण्यात आलेल्या पत्राचा पाठविल्याचा दिनांक | जा.क्र.लाक्षेविप्रा.लातूर/आस्था-1/धा-13/3223 दिनांक 25/11/2022 |
| 4 | माहिती किती कालावधीसाठी अपलोड करावयाची आहे. | दि. 05/12/2022 ते दि. 19/12/2022 पर्यंत. |
| 5 | कारण | जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेस्तव |
| 6 | संकेतस्थळावरील माहिती कोठे अपलोड करावी याचा तपशील | प्रकटने |
| 7 | अपलोड करण्यात येणाऱ्या धारिकांची (फाईल) संख्या | 1 |

पुरविण्यात आलेली माहिती व संकेतस्थळावरती अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे तपासलेली असून ती अचुक असल्याँची खात्री करण्यात आलेली आहे. सदर अपलोड होणाऱ्या कागदपत्रांची संपुर्ण जबाबदारी या कार्यालयाची राहील.

**स्थळ प्रत मा. अ.अ. व प्र. यांचे स्वाक्षरीत.**

**(श्रीमती. म. व्यं. तोरणाळे)**
उपअधीक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर

# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग

**जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेण्या बाबत.**

महाराष्ट्र शासन सा.प्र.वि शा.नि.क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र. 100/13 दि.17/12/2016 अन्वये या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या 4 विभागीय कार्यालयांतर्गत लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील खालील विवक्षीत कामासाठी विहित अटी व शर्तीचे अधीन राहुन 11 महिन्याच्या कालावधीसाठी थेट मुलाखतीद्वारे करार पध्दतीने एकुण 10 सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांची नेमणुक करणे आहे. त्याकरीता जलसंपदा विभागातुन कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 या संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेले स्थापत्य अभियंता यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड झालेल्या सेवानिवृत्त व्यक्तींना उपरोक्त नमुद दि.17/12/2016 च्या शासन निर्णयातील ड (1) (क) प्रमाणे मासीक पारिश्रमिक वेतन देय राहील.

**<u>विवक्षीत कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.</u>**

| अ. क्र. | कार्यक्षेत्र | विवक्षीत कामाचा तपशील | पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र1., लातूर | 1. या विभागाच्या अधिनस्त 67 प्रकल्पावर एकूण 72914 हेक्टर सिंचन क्षेत्र आहे. त्यानुसार विभागीय कार्यालय, लातूर येथे तांत्रिक शाखेशी निगडीत 1. उपविभाग क्र. 1 व 2 शी संबंधित वरिष्ठ कार्यालय, उपविभागीय कार्यालयाचा पत्रव्यवहार पाहणे, अंदाजपत्रकांची प्राथमिक तपासणी करणे, विधानसभा व विधान मंडळाशी संबंधित पत्रव्यवहार, कार्यकारी समिती पत्र व्यवहार, कालवा सल्लगार समिती, वार्षीक पाणी आरक्षण बैठकीबाबत कामे व उपविभागीय कार्यालया मार्फत प्राप्त होणाऱ्या माहितीचे संकलन व वरिष्ठांच्या आदेशानुसार आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी सांगितलेली जबाबदारी पार पाडणे.<br>2. उपविभाग क्र. 4 व 5 शी संबंधित वरिष्ठ कर्यालय, उपविभागीय कार्यानयाचा पत्रव्यवहार पाहणे,अंदाजपत्रकाची प्राथमीक तपासणी करणे, जललेखा, स्थिर चिन्हांकन अहवाल तपासणी, स्थानिक बैठका व वरिष्ठ कार्यालयाच्या बैठकाबाबतचा तपशील, प्राथमीक सिंचन कार्यक्रम, पाखरण कार्यक्रम, वृक्ष लागवड, जलयूक्त शिवार अभियान अंतर्गत कामे महाराष्ट्र जलनिष्पत्ती नियमन बाबत पत्रव्यवहार व उपविभागीय कार्यालया मार्फत प्राप्त होणाऱ्या माहितीचे संकलन व वरिष्ठांच्या आदेशानुसार आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी सांगितलेली जबाबदारी पार पाडणे. | 2 |
| 2 | कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.2, लातूर | 1.पाटबंधारे उप विभाग क्र.8,वाढवना अंतर्गत 28 प्रकल्पाचे 14585 हे.क्षेत्राचे सिंचन पाहणे,सिंचन क्षेत्राची मोजणी करणे,आकारणी तक्ते तयार करणे,आवश्यक त्या प्रकल्पांच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करणे,पाणी पातळी अहवाल देणे व सिंचन व्यवस्थापनाची संबंधीत अनुषंगिक कामे. तसेच तिरु मध्यम प्रकल्पाचे PDN चे कामे , विस्तार व सुधारणा चे कामे,व विषेस दुरुस्तीचे कामे.<br>2. विभागीय कार्यालय,लातूर येथे तांत्रिक शाखेचा उपविभाग व वरिष्ठ कार्यालयाचा पत्रव्यवहार पाहणे,अंदाजपत्रकाची तपासणी करणे, जून अखेर प्रकल्प निश्चिती,जिल्हा माहिती पुस्तिकेसाठी माहिती देणे,प्राधान्यक्रम तयार करणे,वरिष्ठांच्या आदेशानुसार आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी सांगितलेली जबाबदारी पार पाडणे. | 2 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र.1, उस्मानाबाद | 1. अंदाजपत्रकाची तपासणी करणे, जललेखा तयार करणे, 30/06 चे प्रकल्प निश्चिती, 30/06 ची निर्मित सिंचन क्षमता, जिल्हा पुस्तिका तपासणीसाठी माहिती देणे, पावसाळापूर्व व पावसाळा उत्तर प्राधान्यक्रम, विशेष दुरुस्ती अंतर्गत खंडेश्वर मध्यम प्रकल्प व तिंत्रज ल पा चे अंदाजपत्रकाची कामे व इतर कामे.<br>2. उस्मानाबाद पाटबंधारे उपविभाग क्र 1 उस्मानाबाद या उपविभागांतर्गत 33 प्रकल्पाचे 14541 हे. क्षेत्राचे सिंचन पाहणे, सिंचन क्षेत्राची मोजणी करणे, आकारणी तक्ते तयार करणे, आवश्यक त्या प्रकल्पाच्या दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्राके तयार करणे, प्रकल्पाची नियमित देखभाल करणे, पाणी पातळी अहवाल देणे, सिंचन व्यवस्थापनाची संबंधित अनुषंगीक कामे. | 2 |
| 4 | कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र.2, उमरगा | 1.उस्मानाबाद पाटबंधारे उपविभाग क्र.7,नळदुर्ग अंतर्गत 32 प्रकल्पाचे 14889 हे.क्षेत्राचे सिंचन पाहणे,सिंचन क्षेत्राची मोजणी करणे,आकारणी तक्ते तयार करणे,आवश्यक त्या प्रकल्पांच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करणे,पाणी पातळी अहवाल देणे व सिंचन व्यवस्थापनाची संबंधीत अनुषंगिक कामे.<br>2. उस्मानाबाद पाटबंधारे उपविभाग क्र.9,उमरगा अंतर्गत 31 प्रकल्पाचे 13615 हे.क्षेत्राचे सिंचन पाहणे,सिंचन क्षेत्राची मोजणी करणे,आकारणी तक्ते तयार करणे,आवश्यक त्या प्रकल्पांच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करणे,पाणी पातळी अहवाल देणे व सिंचन व्यवस्थापनाची संबंधीत अनुषंगिक कामे.<br>3. उस्मानाबाद पाटबंधारे उपविभाग क्र.6,तुळजापूर अंतर्गत तुळजापूर व मंगरुळ शाखेअंतर्गत् 18 प्रकल्पाचे 6343 हे.क्षेत्राचे सिंचन पाहणे,सिंचन क्षेत्राची मोजणी करणे,आकारणी तक्ते तयार करणे,आवश्यक त्या प्रकल्पांच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करणे,पाणी पातळी अहवाल देणे व सिंचन व्यवस्थापनाची संबंधीत अनुषंगिक कामे.<br>4.विभागीय कार्यालय,उमरगा येथे तांत्रिक शाखेचा उपविभाग व वरिष्ठ कार्यालयाचा पत्रव्यवहार पाहणे,अंदाजपत्रकाची तपासणी करणे, जून अखेर प्रकल्प निश्चिती,जिल्हा माहिती पुस्तिकेसाठी माहिती देणे,प्राधान्यक्रम तयार करणे,वरिष्ठांच्या आदेशानुसार आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी सांगितलेली जबाबदारी पार पाडणे. | 4 |

सदर नेमणुकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती व अर्जाचा नमुना महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईटवर http://wrd.maharashtra.gov.in उपलब्ध आहे. हा अर्ज अटी व शर्ती अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण लातूर या कार्यालयात उपलब्ध आहेत.

उपरोक्त प्रमाणे करारावरील नेमणुकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना सोबत दिलेला असून, इच्छूक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांचेकडे **दिनांक** :- 19/12/2022 ला सायंकाळी 17.45 वाजेपर्यंत पोस्टाने किंवा प्रत्यक्षरित्या सादर करावा. तसेच अर्जाचे पाकीटावर सेवानिवृत्त अधिकारी यांची करारावर नेमणुक करण्याबाबत असे स्पष्ट लिहिण्यात यावे. नियोजित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणुका समितीच्या मुलाखतीद्वारे करण्यात येतील. उपरोक्त नेमणुकांकरीता आलेले कोणतेही अर्ज किंवा सर्व अर्ज अस्विकृत करण्यांचे / रद्द करण्याचे तसेच संपूर्ण नेमणुक प्रक्रिया किंवा करण्यात आलेली नेमणुक रद्द करण्याचे सर्व अधिकार या मंडळाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

**ठळक अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

1) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल. तथापी, ज्या व्यक्तिंची सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्या व्यक्तिची सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या / प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती 70 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

2) सदर नेमणूक 11 महिन्यांसाठी राहील. 11 महिन्या पेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

3) सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई 400032 दि.17/12/2016 मधील अटी व शर्ती प्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिच्छेद-अ नुसार मासिक पारिश्रमिक वेतन अनुज्ञेय राहील.

4) अर्जदार हा जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 असावा व त्यांनी ज्या विवक्षित कामासाठी अर्ज केलेला त्या पदाचे पुरेसे ज्ञान व किमान 5 वर्षाचा अनुभव त्यांना असावा.

5) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांना ते शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.

6) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रु.100/- मुद्रांकावर देणे बंधनकारक राहील.

7) अर्ज करणारे सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांचे विरुध्द कोणत्याही प्रकराची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे. याबाबत अर्जदारांनी ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहेत त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घ्यावे.

8) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येत असल्याने, सबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेच्या इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही. याबाबत अर्जदाराने रु.100/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञालेख द्यावा.

9) उपरोक्त प्रमाणे करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीला संबंधित विभागाचे कार्यक्षेत्रात विभागाचे आवश्यकतेनुसार नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणी कामे करणे अनिवार्य राहील.

10) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीस शासकीय कामाकरीता प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांचे नियुक्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देय राहील.

11) करार पध्दतीवरील व्यक्तीची सेवा कोणत्याही वेळी समाप्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी (अधीक्षक अभियंता) यांना राहतील. त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

12) करारावर नेमणूक दिलेल्या व्यक्तीस नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

13) क्षेत्रीय स्तरावर करारावर नेमणूक दिलेल्या व्यक्तीस काही नैसर्गिक अपघात वा आजार उद्भवल्यास सदर कार्यालय/महामंडळ/शासन त्यास बांधील/जबाबदार राहणार नाही. त्याबाबतचे वैद्यकीय प्रतिपूर्ती कार्यालयामार्फत अनुज्ञेय राहणार नाही.

14) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या **पाच वर्षाच्या गोपनिय अहवालाची** प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडून प्रामाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपुर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

15) महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त **पेंशन आदेश** तसेच **अंशराशीकरणाचे आदेश** (साक्षांकित प्रत) अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

16) करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्याचे 7 दिवसांचे आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

17) सबंधित अधिकारी / कर्मच्यारी यांचेकडून प्राप्त गोपनीय अहवालास अनुसरुन, नियुक्तीचा कालावधी कमी अथवा वाढविण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार ग्राह्य धरला जाणार नाही.

18) असा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामास व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

19) असा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी गुंतलेले हितसंबंध ( Conflict of interest ) जाहीर करणे आवश्यक राहील.

20) अशा करार पध्दतीवरील व्यक्तींना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

21) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजा बाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

22) पात्र उमेदवारांना मुलाखतीकरीता हजर राहण्याबाबत त्यांनी अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनीवर लघु संदेशाद्वारे/संबंधीताचे ई-मेल वर कळविण्यात येईल. तसेच, अशा उमेदवारांची यादी मंडळ कार्यालयाचे सुचना फलकावर दि. 22/12/2022 रोजी प्रकाशीत करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ईमेलद्वारे कळविण्यात येईल.

23) उमेदवाराने सदर नेमणुकीकरीता कोणत्याही राजकीय किंवा इतर मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल.

24) सदर नियुक्ती क्षेत्रीय स्तरावर संबंधीत विवक्षीत कामाकरीता करण्यात येत असून, त्याकरीता योग्य उमेदवार न भेटल्यास निवड करण्यात येणार नाही व या संबंधीचे संपूर्ण अधिकार नियुक्ती प्राधिकारीस राहतील.

25) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन / नियुक्ती अधिकारी/ कर्मचारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

26) उपरोक्त प्रमाणे करार पध्दतीने नेमणुक करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणतेही प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.

करार पध्दतीने नेमणुक झाल्यानंतर उपरोक्त नमुद अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अर्जदाराने रु.100/- च्या स्टँप पेपर वर प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक आहे.

**स्थळ प्रत मा. अ.अ. व प्र. यांचे स्वाक्षरीत.**

**(श्रीमती. म. व्यं. तोरणाळे)**
उपअधीक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर

# विहीत नमुन्यातील अर्ज

जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 संवर्गातुन सेवानिवृत्त झालेले अभियंता यांच्या सेवा सिंचन व्यवस्थापनाच्या / बांधकामाच्या विवक्षित कामाकरीता करार पध्दतीने घेण्या बाबत.

(जाहिरात क्र. दिनांक- )

प्रति,

मा.अधीक्षक अभियंत व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर
कव्हा पाटबंधारे वसाहत,कव्हा रोड,लातूर.
दुरध्वनी क्र. 02382-295508

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

1) अर्जदाराचे पुर्ण नांव :- ---------------------------------
2) जन्म तारीख :- ---------------------------------
3) शिक्षण :- ---------------------------------
4) अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ---------------------------------
5) कोणत्या पदावरुन सेवानिवृत्त झाले :- ---------------------------------
6) सेवानिवृत्त दिनांक :- ---------------------------------
7) ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झालेत त्यांचे नांव (उपविभाग, विभाग) :- ---------------------------------
8) केलेल्या सेवेचा तपशील :- ---------------------------------
9) संबंधित कामाचा अनुभव :- ---------------------------------
10) शारिरीक क्षमता :- ---------------------------------
11) सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेले वेतन व महँगाई भत्ता :- ---------------------------------
12) महालेखाकार कार्यालयाकडुन मंजूर निवृत्त वेतन :- ---------------------------------
13) अंशराशीकृत निवृत्ती वेतन :- ---------------------------------
14) मिळत असलेले निवृत्त वेतन (महागाई भत्त्यासह) :- ---------------------------------
15) सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास त्याचा तपशील दयावा. :- ---------------------------------
16) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- ---------------------------------
17) ई-मेल :- ---------------------------------
18) भ्रमणध्वनी क्रमांक :- ---------------------------------

मला पुर्ण पणे माहिती आहे की, सिंचन व्यवस्थापनाच्या / बांधकामाच्या विवक्षित कामांसाठी जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 संवर्गातुन सेवानिवृत्त झालेल्या अभियंता यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे क्षेत्रिय कामासाठी हंगामनिहाय आहेत व कामाची व्याप्ती प्रमाणे कमी /अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात माझी काम

करण्याची तयारी आहे. तसेच उपरोक्त प्रमाणे करारपध्दतीने नेमणूक देण्यात आल्यास मला कोणतेही प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत,याची मला जाणीव आहे. तसेच प्रचलित शासकीय नियमांतील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे काटेकोरपणे पालन करीन, या बाबत हमी देत आहे.

तसेच, मी प्रतिज्ञेवर सत्य कथन करतो/ करते की,माझे माहिती प्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचुक आहे.यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्वसूचने शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही व पुर्ण नांव

**सोबत जोडलेले दस्ताऐवज :-**

1. जन्म तारखेबाबतचा पुरावा.
2. वैद्यकीय प्रमाणपत्र (अटी व शर्ती क्र.5 नुसार).
3. महालेखाकार कार्यालयाकडुन प्राप्त पेंशन आदेश.
4. महालेखाकार कार्यालयाकडुन प्राप्त अंशराशीकरण आदेश.
5. सेवेच्या शेवटच्या 05 वर्षाचे गोपनीय अहवालाची छायाप्रत.
6. कोणतीही विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण नसल्याबाबत विभागाचे प्रमाणपत्र.
7. निवृत्ती वेतनाबाबतचे बॅक खात्याचे पासबुक वरील सुरवातीचे व अलीकडील 10 नोंदीची छायाप्रत.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ.
# अधीक्षक अभियंता व प्रशासक
**लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,लातूर-** 413512.
**कव्हा पाटबंधारे वसाहत,कव्हा रोड,लातूर.**
**दुरध्वनी क्र.** 02382-295508, E-Mail : secadalatur@gmail.com

**जा.क्र. लाक्षेविप्रा.लातूर/आस्था-1/धा-13** **दिनांक :-**

प्रति,

मा.संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नविन प्रशासकीय भवन,
17 वा मजला, मंत्रालय, मुंबई-32.

**विषय :-** जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेस्तव जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.

**संदर्भ :-** १. म.शा.,सामान्य प्रशासन विभाग,शानिक्र-संकिर्ण२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६
२. म.शा.,सामान्य प्रशासन विभाग,शानिक्र./मावज-२०१८/प्र.क्र.३४८/१८ दि. २०.१२.२०१८
३. प्राधिकरण कार्यालयाचे पत्र जा.क्र.लाक्षेविप्रा/आस्था-१/धा-१३/२५१९ दिनांक १९/०९/२०२२
४. महामंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.गोमपाविम/आस्था-२/९५३४ दिनांक ०३/११/२०२२

या पत्रासोबत सादर करण्यात येत असलेली निविदा सुचना कृपया प्रसिध्दीस देण्यात यावी ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| 1 | कार्यालयाचे नांव | अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर |
| 2 | जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक | दि. 05/12/2022 |
| 3 | बिल कोणाकडे पाठवावे | अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर |
| 4 | जाहिरातीचे स्वरुप व प्रसिध्दीचे स्वरुप | जिल्हा स्तर (एक कॉलम मध्ये प्रसिध्दी द्यावी) |
| 5 | कोणत्या क्षेत्रात सदरचे कार्यक्षेत्र येते | लातूर व उस्मानाबाद |
| 6 | किती वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची | राज्य स्तर मराठी (1 वृत्तपत्र) |

**स्थळ प्रत मा. अ.अ. व प्र. यांचे स्वाक्षरीत.**

**(श्रीमती. म. व्यं. तोरणाळे)**
उपअधीक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर

**प्रत :-** मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:-** मा. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक,लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांचे कार्यालय

## (कव्हा पाटबंधारे वसाहत,कव्हा रोड,लातूर-413512)

**E-mail :-** secadalatur@gmail.com **दुरध्वनी क्रमांक :-** 02382-295508

अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर हे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 यांची सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नेमणुक करण्यासाठी अर्ज मागवित आहेत. सदरची माहिती व अर्ज शासनाचे संकेतस्थळ http://wrd.maharashtra.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावा आणि **दिनांक-** 19/12/2022 रोजी 17.45 **वा.** पर्यंत सादर करावा. अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांनी राखुन ठेवलेला आहे. अर्धवट असलेला अर्ज स्विकारला जाणार नाही. (सदर सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरिल वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर या कार्यालयातील सुचना फलक.

**स्थळ प्रत मा. अ.अ. व प्र. यांचे स्वाक्षरीत.**

**(श्रीमती. म. व्यं. तोरणाळे)**
उपअधीक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर

जा.क्र. आस्थापना-2/ 3223 / दि 25.11.22
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकर, लातूर
कव्हा पाटबंधारे वसाहत,
कव्हा रोड,लातूर.-413512
दिनांक :- ~~01~~ 25/11/2022